जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# कॅम्पस इंटरव्ह्यूतून चार विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कृषी रसायने व कीड व्यवस्थापन अधिविभागामध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. या इंटरव्ह्यूमध्ये एम. एस्सी भाग- २ मधील मंजूषा पोतदार व ऐश्वर्या शेट्टी यांची सातारा येथील संवर्धिनी ॲग्रोटेक या कंपनीमध्ये, विनम्र पाटील याची पुणे येथील पेस्ट कंट्रोल इंडिया, अमित परीट याची कतार येथील ओमान आंतरराष्ट्रीय ग्रुप या कंपनीमध्ये निवड झाली आहे. हा विभाग विद्यापीठाने १९९३ मध्ये सुरू केला आहे. प्रा. डॉ. एस. एस. चव्हाण हे या विभागाचे समन्वयक म्हणून काम पाहतात.

19 MAY 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'यिन समर यूथ समिट'चे मंगळवारपासून आयोजन

## नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद : महालक्ष्मी अन्नछत्र व 'विद्याप्रबोधिनी'चे विशेष सहकार्य

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : 'डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशन'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क-'यिन' या व्यासपीठाच्या माध्यमातून मंगळवार (ता. २३) पासून स्पेक्ट्रम अॅकॅडमी प्रस्तुत 'यिन समर यूथ समिट'चे आयोजन केले आहे. पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवनात सलग तीन दिवसांचे हे शिबिर असेल. शिबिरात सहभागासाठी तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इच्छुकांनी तत्काळ नोंदणी करावी,




असे आवाहन 'यिन' परिवाराने केले आहे. दरम्यान, नीलया एज्युकेशन ग्रुप पॉवर्ड बाय असणाऱ्या या शिबिरासाठी श्री महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट आणि विद्याप्रबोधिनी

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांचे सहप्रायोजकत्व मिळाले आहे.

तरुणांमधील सळसळत्या उत्साहाला दिशा देण्यासाठी 'यिन' राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये




कार्यरत आहे. यंदाच्या समर यूथ समिटमध्ये राज्यातील तज्ज्ञ मंडळी तरुणाईशी संवाद साधणार आहेत. यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्थेसह तीन दिवसांत जेवण, शिबिर किट, बॅच आणि सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सलग तीन दिवस सकाळी नऊ ते सायंकाळी सात या वेळेत तीन सत्रांत शिबिर होईल. सक्सेसफुल बिझनेस, टीम बिल्डिंग, युवा व राजकारण, सेलिब्रेटींशी संवाद, डिजिटल व ऑनलाइन मार्केटिंग आणि सायबर क्राइम, ऑनलाइन बँकिंग, स्टार्टअप- द नेक्स्ट बिग थिंग, इमेज बिल्डिंग, आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांशी संवाद, क्रीडा व करिअरविषयी मार्गदर्शन, प्रेझेंटेशन स्किल्स अशा विविध विषयांवर विविध सत्र होतील. यात देश-विदेशातील तज्ज्ञ मार्गदर्शक तरुणाईशी संवाद साधणार आहेत. यातून प्रत्येकाला नवी प्रेरणा आणि दिशा मिळणार आहे. सहभागासाठी 'यिन' सदस्यांना शंभर रुपये आणि इतर विद्यार्थ्यांना तीनशे रुपये प्रवेश शुल्क असेल. चला तर मग आजच नोंदणी करू या...!

(अधिक माहितीसाठी संपर्क- सूरज- ९९७०८७६९७२, सुशांत- ८८८८१६६११४.)

### मार्गदर्शक वक्ते असे

**उद्योजक जयसिंह चौहान, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, याहूज् डिजिटल मार्केटिंगचे संस्थापक सुजय खांडगे, नीलय मेहता, विटो अल्बट्रो, स्पेक्ट्रम अॅकॅडमीचे सुनील पाटील, प्रसिद्ध जाहिरातकार अनंत खासबारदार, मानसोपचार तज्ज्ञ संतोष इंगळे, अपर पोलिस अधीक्षक सुहेल शर्मा, आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू रेश्मा माने, प्रसिद्ध दुर्गअभ्यासक डॉ. अमर अडके.**

19 MAY 2017 महाराष्ट्र टाईम्स जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. नितीन करमळकर कुलगुरूपदी रूजू

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विसावे कुलगुरू म्हणून डॉ. नितीन करमळकर यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून गुरुवारी पदाची सूत्रे स्वीकारली. या वेळी विद्यापीठातील विद्यार्थी, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



विद्यापीठाचे कुलगुरू आणि राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी बुधवारी डॉ. करमळकर यांनी नियुक्ती केली. त्यामुळे करमळकर रूजू होतील अशी चर्चा होती. मात्र, त्यांनी गुरुवारी सायंकाळी पाच वाजता पदाची सूत्रे स्वीकारली. डॉ. करमळकर यापूर्वी पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. पद स्वीकारताना त्यांच्या पत्नी रोहिणी, प्रभारी कुलसचिव डॉ. ए. डी. शाळिग्राम, डॉ. अंजली क्षीरसागर आदी उपस्थित होते. 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी म्हणून प्रवासाला सुरुवात केली. त्यानंतर प्राध्यापक आणि आता कुलगुरू पदापर्यंत पोहोचलो. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवूनच निर्णय घेईन,' अशी प्रतिक्रिया डॉ. करमळकर यांनी व्यक्त केली.